प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २० सप्टेंबर २०२४**

**अभियंते हे निर्माणकर्ते — श्री. संजय शिरसाट, मा. अध्यक्ष**

“अभियंते हे निर्माणकर्ते असून त्यांच्यामुळे देश नावारूपाला येतो”, असे उद्गार श्री. संजय शिरसाट, मा. अध्यक्ष, सिडको यांनी काढले. सिडको इंजिनिअर्स असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या अभियंता दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. भारतरत्न सर एम. विश्वेश्वरैया यांच्या जयंतीनिमित्त देशभर अभियंता दिन साजरा करण्यात येतो. सर एम. विश्वेश्वरैया यांनी अनेक समाजोपयोगी प्रकल्पांकरिता दिलेल्या योगदानामुळे १५ सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिन देशभर अभियंता दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

या कार्यक्रमास श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. दिलीप ढोले, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, श्रीमती गीता पिल्लई, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ), सिडको, श्रीमती शीला करुणाकरन, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्प व विशेष प्रकल्प) सिडको, श्री. एन. सी. बायस, मुख्य अभियंता (नवी मुंबई), श्रीमती प्रमदा बिडवे, व्यवस्थापक (कार्मिक), सिडको, श्री. सुरेश ठाकूर, अध्यक्ष, सिडको इंजिनिअर्स असोसिएशन, श्री. एस एस नरसापूर, सरचिटणीस, सिडको इंजिनिअर्स असोसिएशन यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलनाने व एम. विश्वेश्वरैय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

या प्रसंगी मा. श्री. संजय शिरसाट यांनी सिडकोतील अभियंत्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा देऊन “नवी मुंबईच्या विकासामध्ये अभियंत्यांचा मोलाचा वाटा आहे. अभियंते हे देशाच्या विकासाचे आधारस्तंभ आहेत”, असे मत व्यक्त केले. तसेच आपल्या कामातून अभियंत्यांनी आपली ओळख निर्माण करावी, असा संदेश दिला.

अभियंता दिन कार्यक्रमानिमित्त अद्वितीय कामगिरी स्पर्धांतील वैयक्तिक तसेच सांघिक गटांतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अद्वितीय कामगिरी स्पर्धे अंतर्गत वैयक्तिक गटात श्री. प्रशांत चाहरे, सहा. कार्यकारी अभियंता आणि श्री. श्रेयस बालपांडे, सहा. कार्यकारी अभियंता यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीकरिता श्रीमती किरण राजुरकर आणि डॉ. वीरेंद्र पाटील यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. सांघिक गटात कार्यकारी अभियंता (खारघर १ व खारघर २), कार्यकारी अभियंता (खारघर कोस्टल रोड) आणि कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांच्या संघांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

यानंतर श्री. शेखर दास, महाव्यवस्थापक, अपकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी "महाराष्ट्राज् लाँगेस्ट टनेल ऑन समृद्धी महामार्ग ॲट इगतपुरी" या विषयावर सादरीकरण केले. दुपारच्या सत्रात सुप्रसिद्ध स्टँडअप कॉमेडियन श्री. मंदार भिडे यांच्या कार्यक्रमाने अभियंता दिनाची सांगता झाली.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**
**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**